महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८०२ /२०२२ दि. २६/०८/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे शहरातील कासारवडवली वाहतूक उप विभागाच्या हद्दीत दि. ३१/०८/२०२२ ते ०९/०९/२०२२ या कालावधीत गणेशोत्सव हा सण साजरा होणार असून गणेशमुर्ती विसर्जनाचे दिवशी म्हणजे दि. ०१/०९/२०२२ (दिड दिवसांचे), दि. ०४/०९/२०२२ (गौरी गणपती विसर्जन), दि. ०६/०९/२०२२ (सात दिवसांचे) दि. ०९/०९/२०२२ (अनंत चर्तुदशी) या कालावधीत विसर्जनाचे मार्गावरील वाहतूक सुनिश्चित रहावी या करीता आमजनेतच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१ अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे

**प्रवेश बंद–**
१) घोडबंदर रोडने ठाणेच्या दिशेने येणाऱ्या जड–अवजड वाहनांना **गायमुख जकात नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
२) गुजरात कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने येणा–या जड अवजड वाहनांना चिंचोटी नाका येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.
३) मुंबई, विरार, वसई कडुन घोडबंदर रोडच्या दिशने येणा–या जड अवजड वाहनांना फाउंटन हॉटेल येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची जड–अवजड वाहने ही चिंचोटी नाका– कामण – भिवंडी अंजुर फाटा – अंजुर चौक–मानकोली मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसचुना ही दि. ०१/०९/२०२२ (दिड दिवसांचे), दि. ०४/०९/२०२२ (गौरी गणपती विसर्जन), दि. ०६/०९/२०२२ (सात दिवसांचे) दि. ०९/०९/२०२२ (अनंत चर्तुदशी) या कालावधीत दुपारी १४.०० वा. गणेश मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपे पर्यंत अंमलात राहिल. सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( दत्तात्रय कांबळे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे / मीरा भाईंदर
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

CamScanner

प्रत कार्यवाहीसाठी :–
मा.पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्तालय मिरा भाईंदर
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामिण/पालघर.
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे / मुंबई/ मीरा भाईंदर
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner